सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)
विद्यार्थी विकास मंडळ
गणेशखिंड, पुणे – ४११ ००७

डॉ. प्रभाकर देसाई
एम.ए., पीएच्.डी.
संचालक


संदर्भ : विविमं/२०१७–१८/९०९ दिनांक : ०७/०६/२०१८

प्रति,
मा. प्राचार्य / मा. संचालक
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्न असलेली सर्व
महाविद्यालये व मान्यताप्राप्त संस्था

विषय : शैक्षणिक प्रवेशावेळी विद्यार्थ्यांनी जमा केलेली अनामत रक्कम परत करणेबाबत.

महोदय/महोदया,

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या सर्व संलग्नित महाविद्यालयांमार्फत शैक्षणिक प्रवेश घेताना विद्यार्थ्यांकडून अनुषंगिक अनामत रक्कम घेतली जाते. सदर अनामत रक्कम ही विद्यार्थ्यांना शैक्षणिक वर्ष संपल्यानंतर परत करणे अनिवार्य असते, परंतु काही विद्यार्थ्यांच्या तक्रारींनुसार काही महाविद्यालयाकडून सदर अनामत रक्कम परत केली जात नाही, असे निदर्शनास आणून दिले आहे.

जी महाविद्यालये अशा प्रकारे विद्यार्थ्यांकडून अनामत रक्कम घेत असतील, त्यानी आपल्या महाविद्यालयातील सूचनाफलकावर सदर अनामत रकमेचा कशा पद्धतीने परतावा करता येईल याची नियमावली विद्यार्थ्यांना वाचता येईल अशा ठिकाणी लावावी, म्हणजे त्या आधारे विद्यार्थी आपले शैक्षणिक वर्ष संपल्यानंतर सर्व विहित प्रक्रिया पूर्ण करून आपली अनामत रक्कम परत घेऊ शकतील आणि याबाबत विद्यार्थ्यांना महाविद्यालय प्रशासनाकडून योग्य ते सहकार्य विनातक्रार व विनाविलंब मिळावे असे निदेर्शित करण्यात येत आहे. सदर परिपत्रकाची कार्यवाही तात्काळ करावी.

कळावे, ही विनंती.

[signature]

संचालक,(अतिरिक्त कार्यभार)
विद्यार्थी विकास मंडळ